**Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies,**
*Online ISSN 2278-8808, SJIF 2016 = 6.17, www.srjis.com*
*UGC Approved Sr. No.49366, MAR–APR, 2018, VOL- 5/44*

# पुणे जिल्हा परिषद अर्थसंकल्प : एक दृष्टिक्षेप

**डॉ दिगंबर दुर्गाडे**, सहयोगी प्राध्यापक, टिळक शिक्षण महाविद्यालय, पुणे

***Abstract***

*जिल्हा परिषदेमध्ये त्यांचे आर्थिक वर्षातील सर्व मार्गांनी मिळणारे एकूण उत्पन्न व त्या आर्थिक वर्षामध्ये होणारा एकूण खर्च याचा आगाउ केलेला अंदाज म्हणजे अंदाजपत्रक होय. प्रत्येक जिल्हा परिषदेला स्वत:च्या उत्पन्नाचे वेगवेगळे मार्ग असतात. भांडवली जमा व महसूली जमा तसेच सुरूवातीची शिल्लक या अर्थसंकल्पामधील उत्पन्नाच्या बाजू असतात. तर, भांडवली खर्च, महसूली खर्च व अखेरची शिल्लक या अर्थसंकल्पामधील महत्वाचे मार्ग असतात. प्रत्येक जिल्हा परिषद एकूण उत्पन्नातून विविध बाबींसाठी विभागनिहाय खर्च करीत असते. पुणे जिल्हा परिषदेमध्ये एकूण १४ विविध विभागांचा समावेश केला जातो त्यापैकी शिक्षण हे एक विभाग आहे.*

***महत्वाचे मुद्दे*** *: महसूली जमा, भांडवली जमा, महसूली खर्च, भांडवली खर्च, विविध शिर्ष*

*Scholarly Research Journal's is licensed Based on a work at www.srjis.com*

१. प्रस्तावना :

पुणे जिल्हा परिषदेच्या अर्थसंकल्पामध्ये एकूण १४ विविध विभागांचा समावेश केला जातो त्यापैकी शिक्षण हे एक विभाग आहे. पुणे जिल्हा परिषदेच्या सन २०११—१२ ते २०१५—१६ या आर्थिक वर्षातील अर्थसंकल्पांचा दस्तऐवज म्हणून वापर केला आहे. या पाचही वर्षात शिक्षण विभागाच्या एकूण अर्थसंकल्पातील तरतूदींपैकी सर्वाधिक तरतूद शाळागृह व वॉलकंपांउड, बांधकाम व दुरूस्ती या शीर्षासाठी केली आहे. प्रत्येक आर्थिक वर्षामध्ये २०११—१२ ते २०१५—१६ दरम्यान एकूण शिक्षणविषयक तरतूदीच्या ६० टक्के पेक्षा अधिक तरतूदी शाळागृह, व संरक्षक भिंती बांधणे व दुरूस्ती यासाठी केला आहे. इतर ३२ विविध शीर्षासाठी तुलनेने अत्यंत कमी तरतूदी केलेल्या आहेत.

पुणे जिल्हा परिषदेच्या अर्थसंकल्पात शिक्षणविभागासाठी २०११—१२ मध्ये ८.१८ टक्के, २०१२—१३ मध्ये ९.३१ टक्के, २०१३—१४ मध्ये ११.३४ टक्के, २०१४—१५ मध्ये ९.२९

टक्के, तर २०१५–१६ मध्ये १०.८६ टक्के, इतकी तरतूद केली आहे. ही तरतूद वाढणे आवश्यक आहे. अभ्यास वर्षामध्ये २०११–१२ ते २०१५–१६ या कालावधीतील अर्थसंकल्पातील शिक्षण विभागासाठीची तरतूदीत दरवर्षी वाढझाल्याचे आढळून आले. अपवाद २०१४–१५ या वर्षाचा असून त्या वर्षी तरतूदीत वाढऐवजी घट झाल्याचे दिसून आले.

**२. पुणे जिल्हा परिषदेच्या अर्थसंकल्पातील शिक्षण विषयक तरतूदी :**

सन २०११– १२ ते सन २०१५–१६ या कालावधीत पुणे जिल्हा परिषदेच्या अर्थसंकल्पात केलेल्या शिक्षण विषयक तरतुदींचे विश्लेषण केले आहे. यासाठी पुणे जिल्हा परिषदेच्या सन २०११–१२, २०१२–१३, २०१३–१४, २०१४–१५ आणि २०१५–१६ या आर्थिक वर्षातील अर्थसंकल्पांचा दस्तऐवज म्हणून वापर केला गेला. याकरिता दस्तऐवज नोंदपत्रिका या साधनाचा माहिती संकलित करण्यासाठी वापर केला गेला.

**३. पुणे जिल्हा परिषदेचे अर्थसंकल्प (२०११–१२ ते २०१५–१६)**

पुणे जिल्हा परिषदेच्या सन २०११–१२ ते २०१५–१६ या पाच वर्षांच्या कालावधीमधील अर्थसंकल्पांमध्ये महसूली जमा, भांडवली जमा आणि महसूली खर्च, भांडवली खर्च, शिल्लक इ. बाबींचा समावेश आहे. त्याबाबत सविस्तर नोंद खालील कोष्टकात केली आहे.

**पुणे जिल्हा परिषदेच्या सन २०११–१२ ते २०१५–१६ या कालावधीतील अर्थसंकल्प**

| अक्र | *तपशील* | २०११–१२ | २०१२–१३ | २०१३–१४ | २०१४–१५ | २०१५–१६ |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | *आरंभीची शिल्लक* | ७५४२०००००० | ९२४२५००००० | १०८५४३००००० | १०२३०००००० | ११२६५०००००० |
| २ | *महसूली जमा* | ८४६३०७७०१ | ११५६८८७७०१ | १७००८७०००० | १६८७४००००० | १६००००००००० |
| ३ | *भांडवली जमा प्रेषणासह* | ३८५२१९०००० | ५२३६०००००० | ६११८२००००० | ६८१५०००००० | ८३१००००००० |
| | *एकूण* | ५४५२६९७७०१ | ७३१७१३७,७०१ | ८९०४५००००० | ९५२५४००००० | ११०३६५००००० |
| १ | *महसूली खर्च* | १४२००००००० | १८०००००००० | २५८६३००००० | २७१०३००००० | २२५५०००००० |
| २ | *भांडवली खर्च वित्त प्रेषणासह* | ३८५२१९०००० | ५२३६०००००० | ६११८२००००० | ६८१५०००००० | ८३१००००००० |
| ३ | *अखेरची शिल्लक* | १८०५०७७०१ | २८११३७७०१ | २०००००००० | १००००० | ४७१५००००० |
| | *एकूण* | **५४५२६९७७०१** | **७३१७१३७७०१** | **८९०४५०००००** | **९५२५४०००००** | **११०३६५०००००** |

पुणे जिल्हा परिषदेचा २०११–१२ चा एकूण अर्थसंकल्प ५,४५,२६,९७,७०१ रू. इतका होता. त्यामध्ये २०१२–१३ मध्ये ८६,४४,४०,००० रूपयांची (२५.४८ टक्के) वाढझाली वतो २०१२–१३ च्याअर्थसंकल्प ७,३१,७१,३७,७०१ रू. इतका झाला. पुणे जिल्हा परिषदेच्या सन २०१३–१४ च्या अर्थसंकल्पामध्ये १,५८,७३,६२,२९९ रू. (२१.६९ टक्के) इतकी वाढझाली असून तो ८,९०,४५,००,०००रूपयांवर पोहोचला. त्याचप्रमाणे २०१४–१५ मध्ये अर्थसंकल्पीय रक्कम ९,५२,५४,००,००० रू. इतकी झाली. ही वाढ २०१३–१४ च्या तुलनेत ६. ९७%इतकी होती. २०१५–१६ या आर्थिक वर्षात पुणे जिल्हा परिषदेचा अर्थ संकल्प ११,०३,६५,००,००० रूपये इतका झाला. ही वाढ २०१४–१५ च्या तुलनेत १५.८६ टक्के इतकी होती. आर्थिक वर्ष २०११–१२ व २०१५–१६ या दोन अर्थसंकल्पाची तुलना केल्यास एकूण वाढ ५५,८७,३८,०२,२९९ रू. म्हणजेच १०२.४० टक्के इतकी झाल्याचे दिसून येते. सन २०११–१२ ते २०१५–१६ या पाच वर्षांच्या कालावधीमध्ये पुणे जिल्हा परिषदेच्या अर्थसकल्पात दुपटीने वाढझाली आहे. या वाढलेल्या रकमेचा उपयोग इतर विभागांबरोबरच शिक्षणालाही झाल्याचे दिसून येते. सन २०११–१२ पासून २०१५–१६ या पाच वर्षाच्या कालावधीत पुणे जिल्हा परिषदेच्या अर्थसंकल्पामध्ये सातत्याने वाढझालेली आहे. तसेच सन २०११–१२ च्या तुलनेत सन २०१५–१६ या आर्थिक वर्षात अर्थसंकल्पामध्ये जवळपास दुपटीने वाढझालेली आहे.

**४. पुणे जिल्हा परिषद अर्थसंकल्पातील विभाग निहाय आर्थिक तरतूदी :**

पुणे जिल्हा परिषदेच्या अर्थसंकल्पात प्रशासन, सामान्य प्रशासन, पंचायत विभाग, वित्त विभाग, शिक्षण, इमारत व दळणवळण आणि इतर अशा १३ विभागांचा समावेश आहे. सन २०११–१२ याच आर्थिक वर्षामध्ये १४ विभाग आहेत. अभ्यासाच्या इतर ४ वर्षामध्ये अर्थसंकल्पामध्ये एकूण १३ विभाग आहे. प्रत्येक आर्थिक वर्षामध्ये या १३ विविध विभागांसाठी आर्थिक तरतूद केली जाते.

Copyright © 2018, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies

सन २०११–१२ ते सन २०१५–१६ या कालावधीमध्ये पुणे जिल्हा परिषदेच्या अर्थसंकल्पातील विविध विभागांसाठीच्या तरतूदी व त्यांचे शेकडा प्रमाण खालील कोष्टकामध्ये दिले आहे.

**पुणे जिल्हा परिषद अर्थसंकल्प –विभागनिहाय तरतुदी (रूपयांमध्ये)**

| | विभाग | २०११–१२ | | २०१२–१३ | | २०१३–१४ | | २०१४–१५ | | २०१५–१६ | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | तरतुद | % | तरतुद | % | तरतुद | % | तरतुद | % | तरतुद | % |
| १ | प्रशासन | ७३३४००० | ०.५२ | ९३६८००० | ०.५२ | १३११७००० | ०.५१ | १३११७००० | ०.४८ | १३१९१००० | ०.५८ |
| २ | सामान्य प्रशासन | १७९८२००० | १.२७ | ३४००७४०० | १.८९ | २४७९२००० | ०.९६ | १८५७२००० | ०.६९ | २४७४०००० | १.१० |
| ३ | पंचायत विभाग | ० | ०.०० | ११७२६०००० | ६.५१ | २१५३९३१५९ | ८.३३ | १९१९६०००० | ७.०८ | १४८१९२००० | ६.५७ |
| ४ | वित्त विभाग | ० | ०.०० | २९१६४००० | १.६२ | २८३००००० | १.०९ | १४०५६००० | ०.५२ | १४०५४००० | ०.६२ |
| ५ | शिक्षण | ११६१२९००० | ८.१८ | १६७५६०००० | ९.३१ | २९३२२३१७५ | ११.३४ | २५१७४०००० | ९.२९ | २४४९००००० | १०.८६ |
| ६ | इमारत व दळणवळण | ६५६९२९०००० | ४६.२६ | ६८८०७८००० | ३८.२३ | ९२५११५००० | ३५.७७ | १०७२३३८०००० | ३९.५७ | ७७४०००००० | ३४.३२ |
| ७ | पाटबंधारे | ४०८५५००० | २.८८ | ११६२९५००० | ६.४६ | २५१२९५००० | ९.७२ | २७९९८१००० | १०.३३ | १९०००००० | ८.४३ |
| ८ | वैद्यकीय | ४१७०१००० | २.९४ | ८३४५५००० | ४.६४ | ९४८५५००० | ३.६७ | ८०२१५००० | २.९६ | ८२०००००० | ३.६४ |
| ९ | सार्वजनिक आरोग्य स्थापत्य | २५७३९५०० | १.८१ | ८४९७०००० | ४.७२ | ११२३८५००० | ४.३५ | १३७७९१००० | ५.०८ | १०३३८३००० | ४.५८ |
| १० | कृषी | ५७६१६००० | ४.०६ | ८७८५०००० | ४.८८ | ११४०००००० | ४.४१ | ८८३००००० | ३.२६ | ८०४००००० | ३.५७ |
| ११ | पशुसंवर्धन | २०७२२००० | १.४६ | ३००७०८०० | १.६७ | ३९०३०००० | १.५१ | ३६६६३१७० | १.३५ | ३२५००००० | १.४४ |
| १२ | समाजकल्याण | २२८०३२५०० | १६.०६ | २२८८००१४० | १२.७१ | ३०७४६६६६६ | ११.८९ | ३६९१३१८३० | १३.६२ | ३७२०५०००० | १६.५० |
| १३ | महिला व बालकल्याण | १३०९१७००० | ९.२२ | १२३१२१६६० | ६.८४ | १६७३२८००० | ६.४७ | १५६४३५००० | ५.७७ | १७५५९०००० | ७.७९ |
| १४ | संकीर्ण | ७६०४३००० | ५.३६ | ० | ०.०० | ० | ०.०० | ० | ००.०० | ० | ०.०० |
| | एकूण रक्कम | १४२०००००० | १०० | १८०००००००० | १०० | २५८६३००००० | १०० | २७१०३००००० | १००.०० | २२५५००००० | १०० |

Copyright © 2018, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies

पुणे जिल्हा परिषदेच्या २०११–१२ च्या अर्थसंकल्पामध्ये एकूण तरतूद १,४२,००,००,००० रूपये इतकी आहे. यामध्ये सर्वाधिक तरतूद इमारत व दळणवळणासाठी (४६.२६%) आहे तर सर्वात कमी तरतूद प्रशासन व सामान्य प्रशासनासाठी (अनुक्रमे ०.५२% व १.२७% ) केली आहे. या अर्थसंकल्पात शिक्षणासाठी ११,६१,२९,००० रूपये (८.१८%) इतकी म्हणजेच ४ थ्या क्रमांकाची तरतूद केली आहे.

सन २०१२–१३ या अर्थसंकल्पामध्ये एकूण तरतूद १,८०,००,००,००० रूपये इतकी केली आहे. यामध्ये सर्वाधिक तरतूद पुन्हा इमारत व दळणवळण (३८.२३%) आहे तर शिक्षणासाठी १६,७५,६०,००० रूपये (९.३१%) म्हणजेच ३ ऱ्या क्रमांकाची तरतूद केली आहे. शिक्षणाला २०११–१२ च्या तुलनेत या वर्षी अधिक महत्व दिले आहे.

सन २०१३–१४ च्या अर्थसंकल्पामध्ये एकूण तरतूद२,५८,६३,००,००० रूपये इतकी आहे. यामध्येही इमारत व दळणवळण या विभागासाठी सर्वाधिक ३५.७७% इतकी तरतूद केली आहे. या वर्षीसुध्दा शिक्षणासाठी सर्वाधिक तिसऱ्या क्रमांकाची तरतूद (११.३४%) केली आहे. ती २०१२–१३ या आर्थिक वर्षाच्या अर्थसंकल्पीय तरतूदींच्या तुलनेत ७४.१% ने जास्त आहे. म्हणजेच  या वर्षीच्या शिक्षणासाठीच्या तरतूदीमध्ये भरीव वाढझाल्याचे दिसून येते.

पुणे जिल्हा परिषदेच्या २०१४–१५ चा अर्थसंकल्प एकूण २,७१,०३,००,००० रूपयांचा आहे. यामध्येही सर्वाधिक तरतूद (३९.५७%) ही इमारत व दळणवळण या विभागासाठी केलेली आहे. या वर्षीही शिक्षणासाठी २५१७४०००० इतकी म्हणजेच तिसऱ्या क्रमांकाची तरतूद ९. २९% केलेली आहे. परंतु ती २०१३–१४ च्या तुलनेत १४.१५% ने कमी आहे.

सन २०१५–१६ या वित्तीय वर्षामध्ये अर्थसंकल्प २,२५,५०,००,०००रूपयांचा असून त्यामध्ये सर्वात कमी तरतूद प्रशासन, वित्त विभाग व सामान्य प्रशासन या विभागांना आहे. सर्वाधिक तरतूद (३४.३२%) इमारत व दळणवळणासाठी आहे. या वर्षी शिक्षणासाठी १०.८६% इतकी तरतूद केली आहे. ती २०१४–१५ च्या तुलनेत २.७२% ने कमी आहे. सन २०११–१२ ते सन २०१५–१६ या कालावधीमध्ये पुणे जिल्हा परिषदेच्या अर्थसंकल्पात इमारत व दळणवळण आणि समाजकल्याण विभागाच्या खालोखाल शिक्षणाला महत्व दिले आहे.

२०११–१२ च्या अर्थसंकल्पामधील शिक्षणविषयक तरतूदींमध्ये २०१५–१६ या आर्थिक वर्षापर्यंत ११,६१,२९,००० वरून २४,४९,००,००० पर्यंत म्हणजेच १२,८७,७१,००० (११०. ८९ टक्के) इतकी वाढझाल्याचे आढळते. याचाच अर्थ पाच वर्षात पुणे जिल्हा परिषदेच्या अर्थसंकल्पामध्ये शिक्षणविषयक तरतूदींमध्ये दुप्पटीहून अधिक वाढझाल्याचे दिसून येते.

पुणे जिल्हा परिषदेचा सन २०११–१२ च्या अर्थसंकल्पातील तरतूदींची रक्कम सर्वात कमी आहे. तर सन २०१४–१५ या अर्थसंकल्पातील तरतूदींची रक्कम सर्वात जास्त आहे. २०११–१२ ते २०१४–१५ पर्यंत अर्थसंकल्पातील तरतूदींची रक्कम सतत वाढत गेली आहे. परंतु २०१५–१६ या अर्थसंकल्पातील तरतूद २०१४–१५ च्या तुलनेत कमी झाली आहे कारण या वर्षी भांडवली खर्चाच्या रकमेत वाढझालेली आहे,परिणामी महसूली जमा कमी झाल्याचे आढळले आहे.

## मराठी संदर्भ

१. ओझरकर, सु. रा. (२०११), राजस्व, नागपूर, विदया प्रकाशन.

२. सांळुंके धैर्यशिल (२००८), महाराष्ट्राचा अर्थसंकल्प : एक दृष्टिक्षेप, औरंगाबाद, कैलास पब्लिकेशन्स.

३. गोविलकर, वि. म. (२००५), भारताचा अर्थसंकल्प अर्थ आणि अन्वयार्थ, मुंबई, ग्रंथाली प्रकाशन.

४. वित्त विभाग, पुणे जिल्हा परिषद, पुणे (२०११–१२), अर्थसंकल्प, जिल्हा परिषद निधी, सन २०११–१२ चा सुधारित व सन २०११–१२ चा मूळ अर्थसंकल्प, पुणे, जिल्हा परिषद.

५. वित्त विभाग, पुणे जिल्हा परिषद, पुणे (२०१२–१३), अर्थसंकल्प, जिल्हा परिषद निधी, सन २०१२–१३ चा सुधारित व सन २०१२–१३ चा मूळ अर्थसंकल्प, पुणे, जिल्हा परिषद.

Copyright © 2018, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies

६. वित्त विभाग, पुणे जिल्हा परिषद, पुणे (२०१३–१४), अर्थसंकल्प, जिल्हा परिषद निधी, सन २०१३–१४ चा सुधारित व सन २०१३–१४ चा मूळ अर्थसंकल्प, पुणे, जिल्हा परिषद.

७. वित्त विभाग, पुणे जिल्हा परिषद, पुणे (२०१४–१५), अर्थसंकल्प, जिल्हा परिषद निधी, सन २०१४–१५ चा सुधारित व सन २०१४–१५ चा मूळ अर्थसंकल्प, पुणे, जिल्हा परिषद.

८. वित्त विभाग, पुणे जिल्हा परिषद, पुणे (२०१५–१६), अर्थसंकल्प, जिल्हा परिषद निधी, सन २०१५–१६ चा सुधारित व सन २०१५–१६ चा मूळ अर्थसंकल्प, पुणे, जिल्हा परिषद.

९. वित्त विभाग, पुणे जिल्हा परिषद, पुणे (२०११–१२), प्रदाने लेखाशीर्ष, जिल्हा परिषद निधी, सन २०११–१२ चा खर्च, पुणे, जिल्हा परिषद.

१०. वित्त विभाग, पुणे जिल्हा परिषद, पुणे (२०१५–१६), प्रदाने लेखाशीर्ष, जिल्हा परिषद निधी, सन २०१५–१६ चा खर्च, पुणे, जिल्हा परिषद.

११. वित्त विभाग, पुणे जिल्हा परिषद, पुणे (२०१५–१६), प्रदाने लेखाशीर्ष, जिल्हा परिषद निधी, सन २०१५–१६ चा खर्च, पुणे, जिल्हा परिषद.

१२. वित्त विभाग, पुणे जिल्हा परिषद, पुणे (२०१५–१६), प्रदाने लेखाशीर्ष, जिल्हा परिषद निधी, सन २०१५–१६ चा खर्च, पुणे, जिल्हा परिषद.

१३. वित्त विभाग, पुणे जिल्हा परिषद, पुणे (२०१५–१६), प्रदाने लेखाशीर्ष, जिल्हा परिषद निधी, सन २०१५–१६ चा खर्च, पुणे, जिल्हा परिषद.

*Copyright © 2018, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies*